दिनांक २६/०६/२०२०

## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक कैलास तेजराव वाघ, पोलीस नाईक नेमणुक - पोलीस ठाणे पिशोर, ता. कन्नड, औरंगाबाद ग्रामीण यांनी १०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | **कैलास तेजराव वाघ, वय ३१ वर्ष, पोलीस नाईक नेमणुक - पोलीस ठाणे पिशोर, औरंगाबाद ग्रामीण** |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे पिशोर, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री. संदीप राजपुत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | १०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे विरुद्ध पोलीस ठाणे पिशोर येथे दाखल असलेल्या गुन्ह्यात मदत करणेसाठी. |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | पोलीस ठाणे पिशोर, औरंगाबाद ग्रामीण येथे |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांचे विरुद्ध पोलीस ठाणे पिशोर येथे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यात मदत करणेसाठी लोकसेवक कैलास वाघ, पोलीस नाईक, नेमणुक - पोलीस ठाणे पिशोर, औरंगाबाद ग्रामीण हे १०००/- रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, पोलीस नाईक वाघ यांनी तक्रारदार यांच्याकडे १०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज दिनांक २६/०६/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, कैलास तेजराव वाघ, पोलीस नाईक नेमणुक - पोलीस ठाणे पिशोर, औरंगाबाद ग्रामीण यांनी तक्रारदार यांच्याकडुन १०००/- रुपये लाचेची रक्कम वर नमुद ठिकाणी स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. सदर आरोपी लोकसेवक यांचे विरुद्ध पोलीस ठाणे पिशोर, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. श्री. अरविंद चावरिया, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. संदीप राजपुत यांनी केली आहे. त्यांना पोह गणेश पंडुरे, पोना गोपाल बरंडवाल, किशोर म्हस्के व चापोशि चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.